# दैनिक महावृत्त

E-Mail:dainikmhavratt@gmail.com

संपादक-अशोक हनवते.मो-9421094991,7264079990






लातूर वर्ष ५ वे अंक १८ गुरूवार दि.१७ जूलै २०२५ पृष्ठे ४ स्वागत मूल्य २ रू.


## धाकट्या भावाच्या युतीवर प्रकाश आंबेडकर प्रचंड संतापले; ४ तासांतच एकनाथ शिंदेंच्या मनसुब्यांना दिला धक्का...



शिवसेनेचे नेते व उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि रिपब्लिकन सेनेचे अध्यक्ष आनंदराज आंबेडकर यांनी दोन्ही पक्षांची युती झाल्याचे जाहीर केले. पण त्यानंतर चार तासांतच वंचित बहुजन आघाडीचे अध्यक्ष प्रकाश आंबेडकर यांनी आनंदराज आंबेडकर यांच्यावर सडकून टीका करत हल्लाबोल चढवला आहे. ही युती म्हणजे आंबेडकरविरोधी असल्याचा संताप त्यांनी व्यक्त केला आहे.

वंचित बहुजन आघाडीने याबाबतचे एक निवेदन प्रसिध्द केले आहे. त्यामध्ये म्हटले आहे की, रिपब्लिकन सेनेची भाजपचा मित्रपक्ष असलेल्या शिवसेनेसोबत युती म्हणजे म्हणजे केवळ भाजपविरोधात आणि संविधान वाचविण्यासाठी लढणाऱ्या चळवळीविरोधातच नव्हे तर फुले, शाहू आणि आंबेडकरांच्या विचारधारेविरोधातही आहे. वंचित बहुजन आघाडीने आनंदराज आंबेडकरावर हल्ला चढविताना त्यांचा पपेट असा उल्लेख केला आहे. आम्ही आधी आनंदराज आंबेडकर यांच्या रिपब्लिकन सेनेला निवडणुकांमधील मदत केली होती. त्यांच्या विनंतीवरून २०१९ च्या विधानसभा निवडणुकीत त्यांच्या उमेदवारांना वंचितच्या एबी फॉर्ममध्ये सामावून घेतले होत. अमरावती लोकसभेत आनंदराज यांना पाठिंबा दिला होता. पण आता हे सौजन्य समाप्त झाले आहे. वंचित काही मुद्द्यांवर मतांमधील भेद स्वीकारू शकते, पण बाबासाहेबविरोधी आणि आरएसएस-भाजपचे पपेट म्हणून काम करणाऱ्यांना नाही, अशी टीका करण्यात आली आहे.

वंचितने शाहू-फुले-आंबेडकरी विचारांच्या लोकांना आवाहनही केले आहे. निवेदनात म्हटले आहे की, आता आरएसएस-भाजपचे पपेट असलेले, संविधानाऐवजी मनुस्मृतीला मानणाऱ्यांसोबत उभे राहायचे की संविधान वाचविण्यासाठी लढणाऱ्या विचारधारेसोबत याचा निर्णय आता शाहू-फुले-आंबेडकरी विचारधारेतील लोकांनी घ्यायचा असल्याचे वंचितने म्हटले आहे. एकप्रकारे वंचितने आंबेडकरी जनतेला आंबेडकर-शिंदे युतीसोबत न जाण्याचेच आवाहन केले आहे.

आनंदराज आंबेडकर यांच्या निर्णयामुळे आम्ही खूप निराश झाल्याचेही वंचितच्या निवेदनात म्हटले आहे. या केवळ आमच्या भावना नाहीत, असे आम्ही मानतो. याद्वारे आम्ही रिपब्लिकन सेनेतील नाराज सदस्यांना वंचित बहुजन आघाडीत येण्यासाठी आमंत्रित करत असल्याचे निवदेनात स्पष्ट करण्यात आले आहे.

निवेदनाच्या माध्यमातून प्रकाश आंबेडकर यांनी एकप्रकारे आनंदराज आंबेडकर आणि एकनाथ शिंदे यांचे टेन्शन वाढविले आहे. रिपब्लिकन सेनेला भगदाड पाडण्याचेच त्यांचे प्रयत्न दिसत आहेत. त्यामुळे आनंदराज आंबेडकर यांच्या माध्यमातून आंबेडकरी मते आपल्यासोबत आणण्याच्या एकनाथ शिंदे यांच्या मनुसब्यांनाही धक्का बसला आहे.

## एकुरगा येथील शाळेत आठवीचा वर्ग सुरू करण्यास मान्यता द्यावी, माजी आमदार धिरज देशमुख यांची सीइओकडे मागणी



लातूर :- लातूर ग्रामीण मधील एकुरगा (ता. लातूर) येथील जिल्हा परिषदेच्या शाळेत आठवीचा वर्ग नसल्याने अनेक विद्यार्थी शिक्षणापासून वंचित राहू शकतात. त्यामुळे येथील जिल्हा परिषदेच्या शाळेत आठवीचा वर्ग सुरू करावा अशी मागणी आतुर ग्रामीणचे माजी आमदार श्री धिरज विलासराव देशमुख यांनी केली शाळेत आठवीचा वर्ग मिळावा म्हणून शाळेतील विद्यार्थ्यांनी व पालकांनी जिल्हा परिषदेच्या आवारात येऊन मंगळवारी आंदोलन केले. या आंदोलनाची दखल घेत लातूर जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी मा श्री राहुल कुमार मीना आणि मा शिक्षणाधिकारी (प्राथमिक आणि माध्यमिक) यांना पत्र पाठवून माजी आमदार धिरज विलासराव देशमुख यांनी वरील मागणी केली

एकुरगा येथील ग्रामस्थांनी जिल्हा परिषदेच्या शाळेत आठवीचा वर्ग द्यावा अशी मागणी केली आहे. या मागणीचा सकारात्मक विचार अद्याप शिक्षण विभागाने घेतलेला नाही त्यामुळे शाळेतील विद्यार्थ्यांनी पालकांनी जिल्हा परिषदेत येऊन आंदोलन केले. शाळेतील विद्यार्थ्यांनी शाळेत शिक्षण घेण्याऐवजी त्यांना आंदोलन करावे लागणे हे न पटणारे आहे. या घटनेचा संवेदनशील त्यांनी विचार करून शिक्षण विभागाने आठवीचा वर्ग मंजूर करावा असे माजी आमदार धिरज विलासराव देशमुख यांनी पत्रात नमूद केले आहे.

## भादा सर्कल भाजपाचे नव्याने मंडल अस्तित्वात अनेकांना पक्षाच्या पदावर काम करण्याची संधी

लातूर : - लातूर ग्रामीण विधानसभा मतदार संघातील औसा तालुक्यात असलेल्या भादा सर्कल भाजपाचे नव्याने मंडल अस्तित्वात आले असून या मंडळाची कार्यकारणी नुकतीच जाहीर करण्यात आली आहे. भाजपाचे नेते आ. रमेशआप्पा कराड यांच्या हस्ते नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांना नियुक्ती पत्राचे वाटप करून सर्व नूतन पदाधिकाऱ्यांना पुढील कार्यासाठी शुभेच्छा दिल्या आहेत.

भारतीय जनता पार्टीच्या वतीने संघटनात्मक बांधणीसाठी लातूर ग्रामीण विधानसभा मतदारसंघात नव्याने पाच मंडल निर्माण केले असून त्यातील भादा मंडलाचे अध्यक्ष उद्धव काळे यांनी या मंडळाच्या कार्यकारिणीची नुकतीच घोषणा केली आहे. नूतन पदाधिकाऱ्यांना लातूर ग्रामीणचे आमदार श्री रमेशआप्पा कराड यांच्या हस्ते लातूर येथील भाजपाच्या संवाद कार्यालयात नियुक्ती पत्राचे नुकतेच वाटप करण्यात आले. यावेळी भाजपाचे विक्रमकाका शिंदे, प्रदीप पाटील खंडापूरकर, भागवत सोट, नवनाथ भोसले, पद्माकर चिंचोलकर यांच्यासह इतर अनेकांची प्रमुख उपस्थिती होती.

भादा मंडलाचे युवा मोर्चा अध्यक्ष महादेव गुरुशेट्टे, महिला मोर्चा अध्यक्ष सुमन माने, किसान मोर्चा अध्यक्ष बालाजी शिंदे, ओबीसी मोर्चा अध्यक्ष सचिन शिवलकर, अनुसूचित जाती मोर्चा अध्यक्ष व्यंकट रसाळ, व्यापारी सेल अध्यक्ष कमलाकर गरड, विद्यार्थी आघाडी अध्यक्ष श्रीराम जावळे, अल्पसंख्यांक मोर्चा अध्यक्ष खय्युम मुलानी यांची नियुक्ती करण्यात आली आहे तर भाजपा भादा मंडल कार्यकारणी उपाध्यक्ष बालाजी साळुंखे, अच्युत इरपे, रवींद्र पाटील, रामकृष्ण जाधव, गिरीधर पवार, निळकंठ मुळे, माधवी रत्ने, अंमरजा ढोक, सरचिटणीस दीपक शिवलकर, समाधान चव्हाण, चिटणीस राहुल कदम, श्रीनाथ बंडगर, सुंदर माने, हनुमंत हिप्परकर, धनराज जावळे, बालिका उबाळे, शर्मिला चांभरगे, कोषाध्यक्ष प्रशांत पाटील यांच्यासह इतर अनेकांचा समावेश करण्यात आला आहे.

यावेळी भाजपा नेते आ. रमेशआप्पा कराड यांनी सर्व नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांचे अभिनंदन करून पुढील कार्यास शुभेच्छा दिल्या त्याचबरोबर येणाऱ्या काळात होणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीत सर्वांनी एका दिलाने, एका जिद्दीने आणि




## जितेंद्र आव्हाड गोपीचंद पडळकर यांच्यात राडा:विधानभवनाच्या गेटवरच एकमेकांना शिवीगाळ; आव्हाडांवर गाडी घालण्याचा प्रयत्न?

मुंबई- राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे आमदार जितेंद्र आव्हाड व सत्ताधारी भाजपचे आमदार गोपीचंद पडळकर यांच्यात आज विधानभवनाच्या गेटवरच जोरदार बाचाबाची झाली. यावेळी आव्हाड यांनी पडळकर यांच्यावर गाडी अंगावर घालण्याचा आरोप केला. यामुळे या घटनेचे गांभिर्य वाढले आहे. विधानभवनाच्या गेटवरच हा प्रकार घडल्यामुळे तिथे मोठी गर्दी जमली होती.

राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे आमदार तथा मुख्य प्रवक्ते जितेंद्र आव्हाड यांनी गत आठवड्यात विधिमंडळ परिसरात भाजप आमदार गोपीचंद पडळकर यांच्याकडे पाहून 'मंगळसूत्र चोरांचा' अशी घोषणाबाजी केली होती. यामुळे पडळकर चांगलेच संतापले होते. या घटनेला ५ दिवस लोटत नाहीत तोच आज विधान भवनाच्या गेटवर या दोन्ही नेत्यांत पुन्हा बाका प्रसंग उद्धवला.

**मी एकटाच आहे, कधीही ये -पडळकर**

त्याचे झाले असे की, जितेंद्र आव्हाड विधिमंडळ प्रवेशद्वाराच्या जवळून पायी जात होते. त्यावेळी आमदार गोपीचंद पडळकर यांची गाडी थेट त्यांच्या दिशेने आली. यावेळी पडळकर यांच्या गाडीचा दरवाजा आपल्याला लागल्याचा आरोप आव्हाड यांनी केला. त्याचा जाब त्यांनी पडळकरांना विचारला. यावेळी दोन्ही नेत्यांत चांगलेच वाक्युद्ध रंगले. मी एकटाच आहे. कधीही ये.



मुंबईत राहिलो. पण ही कुठली पद्धत आहे? आमच्या अंगावर तुझ्यासारखी अशी कुत्री घेऊन मी फिरत नाही, असे पडळकर यावेळी म्हणाले. त्यावर जितेंद्र आव्हाड यांनीही त्यांना त्याच शब्दांत प्रत्युत्तर दिले. मी आयुष्यभर मुंबईत राहिलो. धमकी कुणाला देतो, असे ते म्हणाले.

**माझ्या अंगावर गाडी घालण्याचा प्रयत्न - आव्हाड**

जितेंद्र आव्हाड यांनी त्यानंतर माध्यमांशी संवाद साधताना पडळकरांनी माझ्या अंगावर गाडी आणल्याचा आरोप केला. मी मंगळसूत्र चोर म्हणालो होतो. त्याचा राग गोपीचंद पडळकर यांना का यावा? त्यांनी माझ्या अंगावर गाडी का आणली? त्यांनी माझ्या दिशेने गाडी आणली नसती तर हे प्रकरणच घडले नसते, असे ते म्हणाले. यावेळी त्यांनीही पडळकर यांच्याविषयी बोलताना अत्यंत शिवराळ भाषेचा वापर केला.

हा काय बालिशपणा आहे. त्यांनी दरवाजाला लाथ मारली. त्यानंतर तो दरवाजा मला लागला. अशा छोट्या-मोठ्या गोष्टींकडे कोण लक्ष देते म्हणून मी पुढे आलो. मी आयुष्यभर मुंबईत राहिलो. पण ही कुठली पद्धत आहे? आमच्या अंगावर गाड्या घालायच्या? कोण ऐकूण घेणार? कशाला आमच्या अंगावर गाडी घालायची? व्हिडिओत दिसेलच काय झाले ते. यापूर्वीही असेच झाले होते. जाणिवपूर्वक खोड काढायची. तुम्हाला एवढा राग का येतो? तुम्हाला एवढे वाईट का वाटावे? असेही आव्हाड यावेळी बोलताना म्हणाले.

**पडळकरांनी पवार कुटुंबावर केली होती टीका**

उल्लेखनीय बाब म्हणजे भाजप आमदार गोपीचंद पडळकर यांनी काही दिवसांपूर्वी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे अध्यक्ष शरद पवार व त्यांच्या कन्या सुप्रिया सुळे यांच्यावर अश्लाघ्य शब्दांत टीका केली होती. सासू ख्रिश्चन, नवरा ब्राह्मण, बाप मराठा व आई दुसरीच असे एक कॉकटेल घर पुण्यात आहे, असे ते म्हणाले होते. यावेळी त्यांनी पवार कुटुंबीयांचे नाव घेतले नव्हते. पण त्यांचा रोख त्यांच्याच दिशेने होता. आमदार जितेंद्र आव्हाड यांनी गत आठवड्यात त्यांच्या जवळून जाताना मंगळसूत्र चोर अशी नारेबाजी करत त्यांच्या टीकेला जशासतसे प्रत्युत्तर दिले. त्याचा वचपा आज गोपीचंद पडळकर यांनी काढल्याची चर्चा विधिमंडळ परिसरात रंगली होती.

## ए झोनच्या क्षेत्रीय कार्यालयास मनपा आयुक्तांची अचानक भेट

लातूर/ प्रतिनिधी:- लातूर शहर महानगरपालिकेच्या ए झोन कार्यालयास आयुक्त श्रीमती मानसी यांनी बुधवारी (दि. १६)अचानक भेट देऊन पाहणी केली. या भेटीत आयुक्तांनी संपूर्ण कार्यालयाची पाहणी करून अधिकारी व कर्मचाऱ्यांना सूचना केल्या.

नागरिकांकडून येणाऱ्या अडचणींचा किती दिवसात निपटारा होतो ? याची माहिती घेतली. वसुलीचाही आढावा घेतला. पाणी, कचरा, वीज, रस्त्यावरील खड्डे या संदर्भातील तक्रारींचे तात्काळ निवारण करावे. नागरिकांना मूलभूत सुविधा लवकरात लवकर मिळतील यासाठी प्रयत्न करावे, अशा सूचना त्यांनी दिल्या. नागरिकांना पिण्याचे पाणी वेळेत मिळावे असेही त्या म्हणाल्या.



ए झोन क्षेत्रीय कार्यालया अंतर्गत झालेल्या अनधिकृत बांधकामांच्या तक्रारीवर कार्यवाही करावी. अतिक्रमणावर कार्यवाही करावी तसेच प्रभागातील सर्व घरामध्ये दररोज घंटागाडी जाते का? याची पाहणी करावी अशा सूचना त्यांनी केल्या. घंटागाडीमार्फत ओला व सुका कचरा वेगवेगळा संकलित होतो का? याची तपासणी करावी. प्रभागात जिथे नेहमी कचरा पडतो त्या ठिकाणांची पाहणी करून उपाययोजना कराव्यात. अतिवृष्टी झाल्यास जेथे पाणी तुंबून राहते ती ठिकाणे पाहून त्यावरील उपाययोजना कराव्यात. वादळी वाऱ्यामुळे मुख्य रस्ते,विजेच्या तारा आदीवर झाडे कोसळून वीज पुरवठा विस्कळीत होतो. वाहतूक खोळंबते.अशावेळी वाहतूक तसेच वीज पुरवठा सुरळीत करून नागरिकांना सुविधा देण्यासाठी सर्व विभागांशी समन्वय ठेवून तात्काळ उपाययोजना कराव्यात, असेही आयुक्त म्हणाल्या.

कर्मचाऱ्यांनी कार्यालयात वेळेवर उपस्थित रहावे असे सांगून उशिरा येणाऱ्या कर्मचाऱ्यांवर कार्यवाही करण्याचे निर्देशही आयुक्तांनी दिले.

## लातूरमध्ये अवैध सावकारीचा सुळसुळाट, गरीब जनतेचा छळ चौकशी करून कारवाई करण्याची आमदार अमित देशमुख यांची विधानसभेत मागणी;

### सहकार मंत्री बाबासाहेब पाटील यांच्याकडून कार्यवाहीची ग्वाही

मुंबई / प्रतिनिधी :- लातूर शहराच्या पूर्व भागात वाढलेल्या अवैध सावकारकीचा बंदोबस्त करावा, भरमसाठ व्याज वसूल करण्यासाठी गरीब गरजू जनतेचा छळ करून त्यांच्यावर अत्याचार केले जात आहेत. या सर्व प्रकारणाची वरिष्ठ अधिकाऱ्यांमार्फत चौकशी करून संबंधितावर कारवाई करावी, अशी मागणी बुधवारी माजी मंत्री आमदार अमित विलासराव देशमुख यांनी विधानसभेत केली.




पावसाळी अधिवेशनादरम्यान बुधवारी विधानसभेत बोलताना अवैध सावकारीचा मुद्दा माजी मंत्री आमदार अमित विलासराव देशमुख यांनी उचलून धरला, ते म्हणाले की, अवैध सावकारीची महाराष्ट्रात गंभीर समस्या निर्माण झालेली आहे, लातूरमध्येही हा प्रश्न गंभीर आहे. वैध वित्तसंस्थांकडून कर्ज पुरवठा होत नसल्यामुळे लातूर शहराच्या पूर्व भागात अवैध सावकारीचा सुसळाट निर्माण झाला आहे. दाम दुप्पट व्याज वसुलीसाठी अवैध सावकारांकडून गरीब जनतेचा छळ होत आहे, प्रसंगी मुली, महिलावर अत्याचार करण्याच्या धमक्यात दिल्या जात आहेत, यासंबंधीच्या अनेक तक्रारी आल्या आहेत. त्यामुळे यासंदर्भात सक्षम अधिकाऱ्याकडून चौकशी करण्यात यावी, सावकारीच्या परवान्याची पडताळणी करून योग्य निर्णय घेतले जावेत, गंभीर स्वरूपातील अत्याचाराच्या घटनेबाबत विशेष पोलीस महानिरीक्षक आणि पोलीस अधीक्षकाच्या पातळीवरून चौकशी आणि कारवाई करण्यात यावी, अशी मागणी आमदार अमित देशमुख यांनी यावेळी विधानसभेत बोलताना केली. यासंदर्भात आवश्यक ती चौकशी करून योग्य कारवाई केली जाईल, अशी ग्वाही सहकार मंत्री मा. बाबासाहेब पाटील यांनी यावेळी दिली.

# संपादकीय

## महागाईतून दिलासा

जीवनावश्यक वस्तूंची वाढती दरवाढ, अत्यावश्यक सेवांच्या दरात वाढ आदी कारणाने सर्वसामान्यांना महागाईच्या झळा बसत असताना आणि त्याकारणाने जगणे असह्य होत असताना एक सुवार्ता आहे. या झळांची तीव्रता कमी झाली असून त्याचे बाजारावरील अनुकूल परिणामही दिसू लागले आहेत. अन्नधान्य आणि इंधनाच्या किमती लक्षणीयरीत्या घसरल्याने, जूनमध्ये घाऊक किंमत निर्देशांकावर आधारित महागाई दर ०.१३ टक्क्यांवर घसरला. ऑक्टोबर २०२३ नंतर प्रथमच घाऊक महागाई दर शून्याखाली गेला. सोमवारी प्रसिद्ध झालेल्या सरकारी आकडेवारीनुसार, जून २०२५ मध्ये घाऊक महागाईचा नकारात्मक दर हा मुख्यतः अन्नधान्य वस्तू, खनिज तेल, मूलभूत धातूंचे उत्पादन आणि नैसर्गिक वायू इत्यादींच्या किमतींत घट झाल्याचा परिणाम आहे. इस्रायल विरुद्ध इराण युद्ध आणखी भडकले असते, तर कच्चे तेल आणि नैसर्गिक वायू या दोन्हींचे भाव आकाशला भिडले असते. तशी चिन्हे दिसू लागलेली होती. परंतु युद्ध थांबल्यामुळे परिस्थिती सुधारली. ३० मे २०२५ रोजी कच्च्या तेलाचे दर प्रतिबॅरल ६२ डॉलर इतके खाली घसरले. परंतु इस्रायलने इराणमधील अण्वस्त्रांच्या ठिकाणांवर हावाई हल्ले केल्यामुळे हे भाव ७८ डॉलर प्रतिबॅरलवर पोहोचले होते. आता कच्च्या तेलाच्या किमती प्रतिबॅरल ६९ डॉलरच्या आसपास आलेल्या आहेत. केंद्रीय उद्योग मंत्रालयाने दिलेल्या निवेदनानुसार, भारतातील उत्पादित वस्तूंच्या किमतींतही घट झालेली आहे.

घाऊक किंमत निर्देशांकावर आधारलेला महागाई दर मे २०२५ मध्ये ०.३९ टक्के होता. त्या तुलनेत जूनमध्ये त्यात ५२ आधारबिंदूंची घसरण झाली. २०२४ च्या जूनमध्ये भाववाढीचा दर ३.४३ टक्के इतका होता. मुळात यावर्षीच्या जूनमध्ये वार्षिक तुलनेत भाज्यांच्या किमती २२ टक्क्यांनी घसरल्या. त्याअगोदरच्या मे महिन्यात त्यात २१ टक्क्यांची घसरण झाली. यावेळच्या मे महिन्यात अन्नधान्यांच्या वस्तूंत १.५६ टक्के, तर जूनमध्ये पावणेचार टक्क्यांची घसरण झाली. इंधन आणि विजेच्या किमतीही २.६५ टक्क्यांनी जूनमध्ये कोसळल्या; तर उत्पादित वस्तूंच्या किमतीतील वाढ जूनमध्ये फक्त १.९७ टक्के इतकी होती. सणासुदीचे दिवस जवळ आल्यामुळे सर्वसामान्य जनतेच्या दृष्टीने महागाईबाबत दिलासा मिळणे, हे फार महत्त्वाचे आहे. केंद्रीय अर्थसंकल्पात मध्यमवर्गीयांना आयकरावर अनेक सवलती जाहीर करण्यात आल्या. त्यामुळे भाववाढीला तोंड देणे त्यांना अधिक सोपे जात आहे.

केंद्र सरकारने राजकोषीय तुटीचे प्रमाण कमी केले आहे. २०२४ च्या अर्थसंकल्पातच ‘खाद्यतेल मिशन’ची घोषणा करून त्यासाठी १० हजार कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली. कडधान्यांत आत्मनिर्भरता साधण्यासाठीही सहा वर्षे कालावधीची दीर्घकालीन योजना राबवली जाणार आहे. संपूर्ण खाद्यतेल आत्मनिर्भरता निदान पुढील २० वर्षांत तरी शक्य नसली, तरी मागील अनुभव पहिल्यास कडधान्यांतील आत्मनिर्भरता येत्या दोन वर्षांत गाठणे शक्य होईल, असा तज्ज्ञांचा अंदाज आहे. कारण डाळींची टंचाई फार तीव्र नाही. तूर, मूग आणि मसूर या खाण्यासाठी वापराच्या दृष्टीने एकमेकींशी संलग्न असलेल्या डाळींचे एकूण उत्पादन जरी ३०–३५ लाख टनांनी वाढले, तरी ते पुरेसे आहे. कारण क्षेत्रवाढ आणि उत्पादकतावाढ असा दुहेरी प्रयत्न करून हरभर्याच्या उत्पादनातदेखील १०–१५ लाख टन वाढ सहज शक्य आहे. म्हणजे एकूण अतिरिक्त उपलब्धता ५० लाख टनांची झाल्यास आपण किमान कडधन्यांत आत्मनिर्भर होऊ शकू. कडधान्यांच्या क्षेत्रात २०१७ ते २०२१ या काळात भारत ८५ ते ९० टक्के आत्मनिर्भर होता.

मागच्या अर्थसंकल्पात पंचवार्षिक कालावधीचे ‘कापूस मिशन’ सुरू करण्याची घोषणा झाली. त्यात उत्पादकतावाढ आणि शाश्वतता या गोष्टींवर भर देण्यात आला आहे. उत्तम दर्जाच्या कापूस उत्पादनावर लक्ष्य केंद्रित करण्यात आले आहे. यामुळे आज ना उद्या कपड्यांचे भावही कमी होऊ शकतील. याव्यतिरिक्त मत्स्य उत्पादन आणि निर्यातीला उत्तेजन देण्यासाठी ‘पंतप्रधान धनधान्य कार्यक्रमांतर्गत’ १०० जिल्ह्यांत उत्पादकतावाढ अभियान राबवले जात आहे. दुसरीकडे, गेल्या काही दिवसांत आवक वाढल्यामुळे लसूण, घेवडा आणि शेवग्याच्या दरांतही घट झाली. भाज्या, डाळी, मांस आणि दुधासह अन्नपदार्थांच्या किमती कमी झाल्यामुळे जूनमध्ये किरकोळ महागाई दराची साडेसहा वर्षांतील विक्रमी अशी २.१० टक्क्यांपर्यंत घसरण दिसून आली. म्हणजे घाऊक किमतींबरोबरच किरकोळ किमतीही घसरत आहेत. एकीकडे हा दिलासा मिळत असला तरी यंदाच्या खरीप हंगामाच्या सुरुवातीलाच अवकाळीच फटका बसला. अतिवृष्टीमुळे पिके पाण्याखाली गेल्याने महाराष्ट्रात शेतकर्याचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले. दुबार पेरणीचे संकट निर्माण झाले. सातत्याने होणार्या मुसळधार पावसामुळे अनेक ठिकाणी पिके सतत पाण्याखाली राहिल्यामुळे कुजून गेली. यंदा मे महिन्याच्या अखेरीस पूर्वमोसमी पाऊस झाला. त्यानंतर लगेचच मोसमी पावसाने हजेरी लावल्यामुळे शेतकर्यांना धूळवाफ पेरणी करता आली नाही. सध्या देशातील बहुतेक भागांत मोसमी पाऊस पोहोचला असून, एकूण पाऊसमान सरासरीपेक्षा खूप अधिक राहिले. विदर्भ व अन्य ठिकाणचे काही अपवाद वगळता एकंदर खरीप पेरण्या चांगल्या झाल्या असल्याची सरकारी आकडेवारी आहे.

# पर्यटकांचा इतर सहली सोबतच डार्क टुरिझमकडे जास्त ओढ.

देश स्वतंत्र करण्यासाठी अनेक क्रांतिकारक,शुरवीर योध्दा यांनी आपले प्राणपणाला लावुन देशाला स्वातंत्र्य मिळवून दिले. सोबतच इंग्रजांचे अत्याचार सुध्दा सहन केले.अशा अनेक स्वतंत्र पुर्वकाळातील गाथा,स्मारके देशात आहेत ती आपण कदापि विसरू शकत नाही आणि विसरणार सुध्दा नाही.यात जालियनवाला बाग,अंदमान कारागृह इत्यादीसह अनेक स्थळे आहेत त्यांना पर्यटक भेट देत असतात.यानंतर स्वातंत्र्योत्तर काळातील भोपाळ गॅस दुर्घटना स्मारक, पंजाबमधील ऑपरेशन ब्लू स्टार राबविण्यात आलेली जागा कारगिलमधील युध्द स्मारके, मुंबईत २६ नोव्हेंबर २००८ साली झालेल्या दहशतवादी हल्ल्यातील ठिकाणे असे अनेक स्वतंत्र पुर्वकाळातील व स्वतंत्र काळातील ऐतिहासिक ठिकाणे पर्यटकांच्या आकर्षणाचे केंद्र असतातच.परंतु गेल्या काही वर्षांतल्या भयावह दुर्घटना किंवा हिंसाचाराच्या घटनांच्या स्थळांनाही पर्यटक आवर्जून भेट देत असल्याचे दिसून येते आणि द्यायलाच पाहिजे.परंतु सध्याच्या परिस्थितीत वाढत्या दुर्घटनांचा जनु काय ओघ लागला की काय असे दिसून येते. त्यामुळे या दुर्घटना ग्रस्त ठीकाणांना आजचा पर्यटक भेट देणे जास्त पसंत करतो.कारण दुर्घटना कशी झाली असावी?का झाली असावी? अशा अनेक आश्चर्यकारक घटना दिसून येतात.अशा अनेक प्रश्नांचा अभ्यास करण्यासाठी किंवा माहिती गोळा करण्यासाठी किंवा कोणी विचारले तर सांगता यावे की आम्ही त्या भयावह दुर्घटनांचे ठिकाणे आम्ही पाहिल्या.म्हणजेच दु:खद किंवा शोकांतिका ठिकाणांना भेट देणे यालाच डार्क टुरिझम म्हणतात.या डार्क टुरिझमकडे सध्याच्या परिस्थितीत पर्यटकांचा वाढता शौक मोठ्या प्रमाणात दिसून येते.यामध्ये अनेक ठिकाणे आहेत अहमदाबाद विमान दुर्घटनाग्रस्त इमारत, मुंब्र्यातील अरूंद रेल्वे रूळ, केरळमधील वायनाडमधील दरड कोसळून २३० हून अधिक जणांचा मृत्यू झाला तो परिसर, चेंगराचेंगरीचे ठिकाणे अशाप्रकारे अनेक दुर्घटनास्थळे, दहशतवादी हल्ल्यांच्या ठिकाणांचे डार्क टुरिझमकरण्याकडे कल वाढत चालला असून अहमदाबाद त्याचे ताजे उदाहरण आहे.या सहली फक्त मनोरंजनासाठी नसून भावनिक आणि शैक्षणिक हेतूही त्यामागे असतो.अशाप्रकारच्या डार्क टुरिझममध्ये दहा टक्क्यांनी वाढ झाल्याचे सांगितले जाते.मुख्यत्वेकरून डार्क टुरिझम म्हणजे मानवी मृत्यू, संहार,युध्द, दुर्घटना, यांच्याशी संबंधित ठिकाणी भेट देणे किंवा तेथील पर्यटन करणे, यालाच डार्क टुरिझमअसे म्हटले जाते. सांगायचे तात्पर्य म्हणजे पर्यटक मनोरंजनात्मक ठिकाण व स्वतंत्रपुर्व काळातील स्मारकांना भेट देतातच सोबत दुर्घटनाग्रस्त(डार्क टुरिझम) भागांना सुध्दा भेट देतात.त्यामुळे पर्यटकांचा ओघ डार्क टुरिझम वाढल्याचे दिसून येते.

**********

लेखक
रमेश कृष्णराव लांजेवार
( स्वतंत्र पत्रकार )
मो.नं.९९२१६९०७७९, नागपूर.

# अपरिमित हानीचे धनी कोण?

फेब्रुवारी २०२२ मध्ये सुरू झालेल्या रशिया आणि युक्रेन युद्धाला तीन वर्षे चार महिने उलटून गेले आहेत. आता आंतरराष्ट्रीय स्ट्रॅटेजिक स्टडीज संस्था आणि रँड कॉर्पोरेशनच्या अहवालांमधून या युद्धात झालेल्या एकंदर हानीचा आकडा समोर आला असून तो चक्रावून टाकणारा आहे. या अहवालानुसार, रशियाविरुद्धच्या युद्धात युक्रेनला आतापर्यंत सुमारे सुमारे ५० लाख कोटी रुपयांहून अधिक फटका बसला आहे; तर रशियाची आतापर्यंत सुमारे २५० ते ३०० अब्ज डॉलरची आर्थिक हानी झाली आहे.



युद्धामध्ये होणारी जीवितहानी व वित्तहानी संबंधित राष्ट्रांना प्रचंड मोठा फटका देऊन जाते. दोन महायुद्धांमधील आणि त्यानंतरच्या शीतयुद्धामधील अमानुष नरसंहार आणि विनाश पाहिल्यानंतर भविष्यातील युद्धे टाळण्यासाठी, शांतता प्रस्थापित करण्यासाठी संयुक्त राष्ट्रांसारख्या संघटनांची स्थापना झाली. अनेक शांतता करार झाले. दरम्यानच्या काळात जागतिकीकरणाचे युग अवतरले आणि राष्ट्रा–राष्ट्रांमधील आर्थिक परस्परावलंबित्व वाढत गेले. यामुळे तिसर्या महायुद्धाच्या भीषण सावटापासून अद्यापपर्यंत तरी जग सुरक्षित राहिले आहे. खरे पाहता शीतयुद्धानंतर अमेरिकाकेंद्री एकध–ुवीय विश्वरचना आकाराला आली आणि जगाचा राजकीय भूगोल बदलून गेला. त्यानंतर राष्ट्रांमध्ये छोटे–मोठे संघर्ष होत राहिले. अमेरिकेकडून काही राष्ट्रांमध्ये हस्तक्षेपी कारवाया झाल्या. आखातामध्येही काही संघर्ष झाले. पण ते प्रदीर्घ काळ चालले नाहीत. मात्र अलीकडच्या काळात अझरबैजान आणि आर्मेनिया युद्धाने पारंपरिक युद्धाची धग संपलेली नाही हे जगाला कळून चुकले. या युद्धाचा अग्नी शांत झाल्यानंतर फेब–ुवारी २०२२ मध्ये रशियाने युक्रेनवर आक्रमण केले आणि जगाच्या युद्ध इतिहासाच्या पुस्तकात एक घनघोर लढाईची नोंद झाली. या युद्धाला तीन वर्षे चार महिने उलटून गेले आहेत. आधुनिक इतिहासात सर्वाधिक काळ चाललेले युद्ध म्हणून या संघर्षाची इतिहासात नोंद झाली आहे. चिंतेची बाब म्हणजे, अद्यापही हे युद्ध थांबलेले नसून कोणत्याही एका चुकीमुळे हे युद्ध अणुयुद्धात परावर्तित होऊ शकते, अशी टांगती तलवार जगावर कायम आहे. अलीकडेच अमेरिकेने युक्रेनला नव्याने आधुनिक शस्त्रास्त्रे देण्याची तयारी केली असल्याचे समोर आले आहे.

अलीकडेच आंतरराष्ट्रीय स्ट्रॅटेजिक स्टडीज संस्था आणि रँड कॉर्पोरेशनच्या अहवालांमधून या युद्धात झालेल्या एकंदर हानीचा आकडा समोर आला असून तो चक्रावून टाकणारा आहे. जागतिक बँक, यूएनडीपी व युक्रेन सरकारच्या माहितीनुसार ७० टक्क्यांपेक्षा अधिक सार्वजनिक पायाभूत रचना पूर्णतः उद्ध्वस्त झाली आहे किंवा ती गंभीररीत्या नुकसानग्रस्त झाली आहे. युक्रेनच्या जीडीपीत २०२२–२३ दरम्यान ३० ते ४० टक्क्यांपर्यंत घसरण झाली असून सुमारे ८० लाखांहून अधिक लोक विस्थापित झाले आहेत. दोन्ही बाजूंकडील एकत्रितपणे सुमारे ५ ते ६ लाख सैनिक जखमी झाले आहेत. या अहवालांनुसार युद्धात युक्रेनला आतापर्यंत सुमारे ५५० ते ६०० अब्ज डॉलर (सुमारे ५० लाख कोटी रुपये) इतकी थेट व अप्रत्यक्ष आर्थिक हानी झाली आहे. ही हानी प्रामुख्याने पायाभूत संरचना उद्ध्वस्त झाल्यामुळे, ऊर्जा प्रकल्प व औद्योगिक युनिटस्च्या विनाशामुळे, शेतजमिनी बेचिराख झाल्याने व स्थलांतरितांमुळे झाली आहे. या भीषण युद्धात युक्रेनला प्रचंड तोटा झाला असला, तरी या युद्धाचे परिणाम आता केवळ रणभूमीपुरते मर्यादित राहिलेले नाहीत. एका बाजूला हजारो लष्करी व नागरी रचना धुळीत मिळाल्या आहेत; तर दुसर्या बाजूला दोन्ही देशांच्या अर्थव्यवस्थांवर व पर्यावरणावरही त्याचा खोलवर परिणाम झाला आहे.

# महानगरातील मरणकळा

प्रगती आणि विकासाचे स्वप्न उराशी बाळगून महानगरांकडे धाव घेणार्या नागरिकांचे जीवन किती बेभरवशाचे झाले आहे याची कल्पनाही करता येत नाही.

कधीही घराबाहेर पडले तरी कधी अपघात, पाण्याखाली गेलेले रस्ते, पाण्यात उतरलेली वीज, पर्यटनाला गेले तर कधी पुलावर तर कधी दर्या–खोर्यात मृत्यू कोठे दडून बसला असेल हे सांगता येणे अशक्य. याशिवाय नगरे असो की गाव तेथे बोकाळलेली गुन्हेगारी कोणत्या रूपाने तुमच्यावर घाव घालेल याचा अंदाजही बांधता येत नाही. मुंबई–ठाणे असो की पुणे, नागपूर, संभाजीनगर, नाशिक आदी महानगरे असो, तेथील आरामदायी जीवनाच्या आशा–अपेक्षा मरणकळामध्ये कधी बदलतात हे सांगता येत नाही. या मरणकळातून बाहेर पडण्याचा मार्ग असला तरी हतबलतेपोटी अनेकांना परतीची दारे बंद झालेली आहेत.

या मरणकळांचे स्वरूपही दिवसाप्रमाणे आणि नगरांप्रमाणे बदलत असते. मात्र, या मरणकळा भोगताना कोणताही भेदभाव होत नाही. स्थलांतरित असा की नगरातील स्थानिक असा, सुशिक्षित असा की अशिक्षित असा, ग्रामीण असा की महानगरी तुम्हाला मरणकळांना सामोरे हे जावेच लागते. सामान्यांच्या अपेक्षा आणि प्रशासनाचे प्राधान्यक्रम यातील विसंगती जागोजागी जाणवत असल्याने वर्षभर वाहतूककोंडीत अडकलेली महानगरे पावसाळ्यात सर्रास पाण्याखाली जातात. पाण्याखाली जाणारी महानगरे हे सार्वत्रिक चित्र असले तरी नागरिकांची सुटका करण्याची फसवी आश्वासने वर्षांनुवर्षे दिली जातात. ना महानगरांचे चित्र बदलते, ना सत्ताधार्यांकडून दिली जाणारी आश्वासने बदलतात. अशाच पाण्याखाली उतरलेल्या वीजप्रवाहामुळे कधी, कोठे मृत्यू गाठेल याची कल्पनाही करता येत नाही.



काही वर्षांपूर्वी राज्यातील सर्व पुलांचे स्ट्रक्चरल ऑडिट करण्याची घोषणा केल्यानंतरही कुंडमळासारख्या घटना घडतच राहतात.

वर्षासहलीचा आनंद घ्यायचा असो किंवा अवकाशातून हवाई प्रवास करायचा असो, जगण्याचा काही भरवसा नाही एवढे आयुष्य बेभरवशाचे झाले आहे. उभरत्या जीवनाची स्वप्ने पाहणार्या कोवळ्या वयातील मुले–मुलांची आयुष्ये अवजड वाहनांखाली चिरडली जाणे, भरदिवसा मोटारीतून प्रवास करणार्यांची होणारी लूटमार, जागोजागी आपणच भाई असल्याच्या घोषणा देत कोयते नाचवत फिरणारी कोवळ्या वयातील मुले, ही सारी चित्रे पाहिली तर खरोखर महानगरातील आयुष्य सुखाचे आहे का, असा गहन प्रश्न पडतो.

पंचवीस वर्षांपूर्वी आयटी नगरी म्हणून जगभर ओळख असलेली हिंजवडी आता आयटी पार्कऐवजी वॉटरपार्क म्हणून हिणवली जात आहे. थोड्याशा पावसाने रस्त्यावरून चार–सहा फूट उंच पाण्याचे लोंढे वाहतात. चारचाकीतील नागरिक जीव मुठीत धरून बसतात, तर अनेकांच्या दुचाकी नजरेसमोरून वाहत जातात. पुण्याच्या बरोबरीने होणार्या वर्षभराच्या वाहतूककोंडीने या परिसराचा श्वास कोंडला आहे. भरीस भर म्हणून खड्ड्यातील रस्ते कधी कोणाचा प्राण घेतील सांगता येत नाही. वीज हा अविभाज्य भाग असलेल्या या संगणक नगरीस ७२ तासांपेक्षा अधिक काळ खंडित वीजपुरवठ्यास सामोरे जावे लागणे फसलेल्या नियोजनाची परिसीमा म्हणता येईल.

या सार्या स्थितीत हिंजवडी परिसरात राहणार्यांना आपण कोणत्या गुन्ह्याची शिक्षा भोगतो आहोत या प्रश्नाचे उत्तर काही मिळत नाही. कोंडीमुक्त वाहतूक, खड्डेमुक्त रस्ते, अखंडित वीज यासारख्या मूलभूत सुविधांसाठी वर्षानुवर्षे प्रशासनाशी झगडणे हेच त्यांचे प्राक्तन दिसते. जगभर नाव होऊन, वेळच्यावेळी कर देऊन आपण नेमके ग्रामपंचायतीत आहोत की महापालिकेत आहोत हेही त्यांना समजत नाही. अशा साध्या प्रश्नासाठी त्यांना मुख्यमंत्र्यापर्यंत धाव घ्यावी लागत असेल तर खालचे प्रशासन, यंत्रणा कुचकामी ठरते हे वेगळे सांगण्याची गरज नाही.

विमानाने परदेशवारी करण्याच्या स्वप्नांचीही दोन मिनिटांत राखरांगोळी होते. अहमदाबाद दुर्घटनेनंतर आठ–दहा दिवसांच्या कालावधीत दीडशे–दोनशे विमानांची उड्डाणे रद्द करावी लागली. याचा दुसरा अर्थ असा आहे की आतापर्यंत नागरिकांनी केलेल्या परदेशवार्या अशाच रामभरोसे होत्या असे म्हणावे लागेल. पुणे–पिंपरीप्रमाणेच मुंबई–ठाण्यातील नागरिक घराबाहेर गेले तर परत येण्याची शाश्वती नाही. कधी पूल तर कधी इमारती कोसळतील. त्याबरोबरीने लोकलमधून प्रवास करतानाही अंगाला अंग किंवा सॅकला सॅक घासली तरी यमदूताचे आमंत्रण येऊ शकते. राज्याची उपराजधानी नागपूरही छोट्या–मोठ्या पावसानंतर सहा–सहा दिवस पाण्याखाली राहते हे एक आश्चर्य म्हणावे लागेल. याप्रमाणे नाशिक, संभाजीनगर या महानगरांची अवस्थाही थोड्या फार फरकाने अशीच आहे.

शनिवार–रविवारच्या सुटीत पावसाळी पर्यटनालाही जाणे अवघड झाले आहे. कधी अख्खी बसच्या बस नदीच्या पुलावरून वाहून जाते तर कधी कुंडमळामध्ये आवाज करत पूल कोसळतो, अशा घटनांनंतर केवळ चौकशीच्या घोषणाच होतात. त्यापासून बोध घेऊन काही पावले टाकल्याचे दिसत नाही. घटनेनंतर टाकलेली दिखाऊ पावले कालौघात नागरिक आणि सत्ताधारीही विसरून जातात. एखादी कुंडमळासारखी दुर्घटना घडली की सगळ्याच पर्यटनावर बंदी घालण्याचा प्रकार तर समजण्यापलीकडचा.

अंधारबनमध्ये गर्दी होते आणि त्यातून दुर्घटना घडेल अशा शक्यतेतून सगळ्याच वर्षापर्यटनांवर बंदी घालण्याचा निर्णय म्हणजे ‘अंधेर नगरी चौपट राजा’ या प्रकारात मोडणारा. अशा प्रकारचे फोकनाड निर्णय घेण्यापेक्षा गर्दी नियंत्रित करण्याची, एक सक्षम व्यवस्था उभारण्याचा पर्याय प्रशासनाला का बरे सूचत नाही? पर्यटनांवर अनेकांची पोटे अवलंबून असताना प्रशासन मात्र जबाबदारी झटकून कातडीबचाव उपाय करत असेल तर सामान्यांनी पाहायचे कोणाकडे?

सायबर फसवेगिरी वाढल्यावर यातील चोरट्यांना वेसण घालण्याऐवजी नागरिकांनाच काळजी घेण्याचे आवाहन केले जात असेल, तर सत्ताधारी आणि कायदा–सुव्यवस्थेची जबाबदारी हाती असलेली पोलीस यंत्रणा हवीच कशाला हाही एक प्रश्नच आहे. रोगापेक्षा इलाज भयंकर अशा स्वरूपाच्या निर्णयामुळे दुर्घटना काही काळापर्यंत टळेल. मात्र, यातून कायमस्वरूपी व्यवस्था कधीच निर्माण होणार नाही. सामान्यांचे जगणेच एवढे अशक्यप्राय झाले आहे की याचा पाठपुरावा करायचा की रोजची जगण्याची लढाई लढायची हेच त्यांना कळत नाही. यावर सारासार विचार करून निर्णय घेणारे फक्त सत्तेच्या मागे लागले असतील आणि फसव्या आश्वासनांच्या स्वप्नात नागरिक हरवले असतील, तर या स्थितीत फरक पडण्याची अपेक्षा तरी कशी करायची?

गावाकडे रोजगार नसल्याने महानगरात आलेल्यांना परतीचा मार्ग नाही. जे गावांकडे राहतात त्यांची काळी आई मोठमोठ्या प्रकल्पाच्या ओझ्याखाली दबणार असेल तर ओसाड गावे आणि मरणकळामध्ये हरवणारी महानगरे हेच आपले वास्तव असणार हे सांगायला कोणाची गरज नाही.

# परित्राण पाठ म्हणजे जीवन जगण्याची पवित्र कला - प्रवचनकार सुगंध कदम

मुंबई :- मनुष्याला संकट, व्याधी, भय, दुःख यांसारख्या मानसिक आणि शारीरिक त्रासांपासून संरक्षण देणारा आणि त्याच्या जीवनात शांती, स्थैर्य व प्रज्ञेचा प्रकाश पसरवणारा पाठ म्हणजेच परित्राण पाठ होय. परित्राण पाठ पठण करताना आपण उंच जागी एक तांब्या ठेवतो त्याला पवित्र दोरा बांधतो आणि तो दोरा सर्व श्रद्धाळूंना हातात दिला जातो - यामागील गूढार्थ फारच सुंदर आहे; हा दोरा म्हणजेच समत्व आणि शुद्धतेचं प्रतीक आहे आपण सर्व निर्मळ, निष्कलंक आणि समान आहोत ही भावना त्या क्षणी घट्ट होते नंतर या दोऱ्याचे दोन्ही टोक एकत्र करून पाण्यात ठेवले जाते याचा गूढार्थ म्हणजे जन्म आणि मृत्यू हे निसर्गाचे अटळ नियम आहेत आणि त्याच्या दरम्यानचा हा जीवनप्रवास धम्माच्या प्रकाशातच योग्य अर्थाने पार करायचा आहे, या परित्राण पठणाच्या माध्यमातून धम्मदान, श्रद्धा आणि सद्भावना या मूल्यांचा प्रसार होतो. यातून निर्माण होणारी सकारात्मक ऊर्जा ही केवळ संकट टाळणारी नसते तर अंतर्मनात एक प्रकारची शुद्धता, प्रज्ञा आणि करुणा जागृत करणारी असते म्हणून परित्राण पाठ हे केवळ संकटांपासून रक्षण करणारे पाठ नसून ते जीवन जगण्याची एक पवित्र कला आहे; शांतीच्या वाटेवर नेणारे आणि धम्माच्या मार्गावर टिकवून ठेवणारे एक सशक्त साधन आहे. असे प्रतिपादन सुगंध कदम यांनी वर्षावास प्रवचन मालिकेचे प्रथम पुष्प गुंफताना केले.

बौद्धजन सहकारी संघ ता. गुहागर, जिल्हा रत्नागिरी गाव व मुंबई शाखा संलग्न संस्कार समिती यांच्या संयुक्त विद्यमाने सालाबादप्रमाणे याही वर्षी आषाढ पौर्णिमा ते अश्विन पौर्णिमा या कालावधीत वर्षावास प्रवचन मालिकेचे आयोजन करण्यात आले आहे, सदर प्रवचन मालिकेचे प्रारंभ तथा प्रथम पुष्प अध्यक्ष सुरेश पवार यांच्या अध्यक्षतेखाली रविवार दि. १३ जुलै २०२५ रोजी बीडीडी चाळ ३ व ४ मधील डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक सभागृह, नायगाव, मुंबई - १४ येथे मोठ्या उत्साहात संपन्न झाले, सदर प्रसंगी संघाचे सरचिटणीस संदेश गमरे व संस्कार समितीचे सचिव सचिन मोहिते यांनी आपल्या धीरगंभीर, पहाडी व प्रभावी आवाजात लाघवी भाषाशैलीत सूत्रसंचालन केले. तसेच अध्यक्ष संदीप गमरे यांनी उपस्थित पाहुण्यांचे स्वागत केले तद्नंतर कार्याध्यक्ष दीपक मोहिते यांनी सदर कार्यक्रमाचे नियोजन, ध्येय, उद्दिष्टे आणि उद्देश स्पष्ट करीत प्रस्ताविक सादर केले त्यावेळी संघाच्या पुढील वाटचाली संदर्भात सुचोवात करीत उपस्थितांना वर्षावासाच्या शुभेच्छा दिल्या. सदर प्रसंगी प्रमुख विश्वस्त सिद्धार्थ पवार, विश्वस्त दीपक जाधव, विश्वस्त पांडुरंग गमरे, माजी मुख्य विश्वस्त संजय पवार, माजी



विश्वस्त राजाभाऊ तथा रामदास धो. गमरे, कार्याध्यक्ष दीपक मोहिते, उपकार्याध्यक्ष अशोक कदम, सरचिटणीस संदेश गमरे, कोषाध्यक्ष प्रदीप कदम, सचिव संदेश जाधव, सुभाष मोहिते आदी मान्यवरांनी शुभेच्छापर विचार मांडले. विभाग अध्यक्ष संतोष पवार, किशोर जाधव, सचिन गमरे, संतोष कदम, संजीवनी यादव, धम्मवर्तन तांबे, संजय पवार, सर्व समितींचे प्रमुख, शाखांचे कार्यकर्ते सदर कार्यक्रमास आवर्जून उपस्थित होते.

अध्यक्षीय भाषणात सुरेश पवार यांनी कोरोना काळापासून तालुका संघाच्या सुरू असलेल्या वर्षावास प्रवचन मालिकेच्या संदर्भातील आढावा मांडत यापुढे ही सर्वांनी एकमताने, एकदिलाने असे उपक्रम राबविले पाहिजे, मुंबईत सुरू झालेली नांदी गावी घराघरात पोहोचली पाहिजे असे मत नोंदवले. माजी विश्वस्त संजय पवार, कार्याध्यक्ष दीपक मोहिते, ऑडीटर शैलेंद्र पवार, सरचिटणीस संदेश गमरे यांनी गेल्या ७५ वर्षात शक्य न झालेली बाब म्हणजे आर्थिक बाजू मजबूत करणे तीही आता पतसंस्थेच्या माध्यमातून आता मूर्तरुपात साकार झाली असून पतसंस्थेच्या रूपात लावलेल्या लहान रोपट्याचे मोठ्या वटवृक्षात रूपांतर करण्यासाठी गाव व मुंबईच्या सर्व शाखा, पदाधिकारी, सभासद यांनी सहकार्य करावे असे आवाहन केले. सरतेशेवटी सदर कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी अथक परिश्रम घेणाऱ्या सर्वांचे तसेच प्रतिवर्षी प्रमाणे याही वर्षी बौद्धजन सहकारी संघ पवारसाक्री शाखा क्र. २० च्या वतीने अल्पोपहाराची व्यवस्था करण्यात आली त्यामुळे त्यांचे आभार व्यक्त करून सरचिटणीस संदेश गमरे यांनी कार्यक्रमाची सांगता केली.

## प्रवीण गायकवाड यांच्यावरील शाईफेक निंदनीय-हेमंत पाटील आरोपींवर मकोका अंतर्गत कारवाई करण्याची मागणी

पुणे/ प्रतिनिधी :- संभाजी ब्रिगेडचे प्रदेशाध्यक्ष प्रवीण गायकवाड यांच्यावर अक्कलकोट येथे शाईफेक झाल्याची घटना अत्यंत निंदनीय तसेच लोकशाहीच्या मुल्यांवर थेट आघात करणारी आहे.या घटनेनंतर सर्वसामान्यांप्रमाणे वैचारिक लढा देणाऱ्यांचे अभिव्यक्ती स्वातंत्र धोक्यात आले आहे का? असा सवाल इंडिया अगेन्स्ट करप्शनचे राष्ट्रीय अध्यक्ष, ओबीसी नेते हेमंत पाटील यांनी बुधवारी (ता.१६) उपस्थित केला.गायकवाड यांच्यावर हल्ला करणाऱ्या आरोपींवर मकोका अंतर्गत कारवाई करावी, अशी मागणी देखील पाटील यांनी केली. दिवसा ढवळ्या एका संघटनेच्या प्रदेशाध्यक्षावर हल्ला होत असेल,तर पोलीस यंत्रणेच्या कार्यपद्धती वरच प्रश्नचिन्ह उभे राहतात.शिवधर्म प्रतिष्ठानचा पदाधिकारी दीपक काटेला यापूर्वी पुणे विमानतळावर जिवंत काडतुसे आणि मॅगझीनसह अटक झाली होती. त्याच्यावर एवढ्या गंभीर गुन्हा दाखल असून सुद्धा तो मोकाट कसा सुटला ? असा सवाल उपस्थित करीत पोलिस प्रशासन राजकीय दबावाखाली काम करत आहे, असा आरोप पाटील यांनी केला. अशा घटनांवर वेळीच वेसण घातले नाही, तर राज्यात दहशतीचे वातावरण निर्माण होईल. अभिव्यक्ती स्वातंत्र्य दडपण्याचे प्रकार घटनादत्त अधिकारांचा अपमान आहेत. सरकारने आणि पोलीस प्रशासनाने या प्रकरणी कठोर भूमिका घेणे गरजेचे आहे. राज्यातील सामाजिक सलोखा आणि लोकशाही टिकवण्यासाठी सरकारने अशा असामाजिक तत्त्वांवर तात्काळ कठोर कारवाई करावी,अशी मागणी त्यांनी केली. नागरिकांनीही शांतता आणि संविधानाच्या चौकटीत राहून आपली भूमिका मांडावी, असे आवाहन पाटील यांनी केले.

## केज नगरपंचायत अंतर्गत महिलांच्या ३२ आजारावरील रक्ताच्या तपासण्या मोफत

केज/प्रतिनिधी महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री अजित दादा पवार व माजी मंत्री आमदार धनंजय मुंडे यांच्या वाढदिवसानिमित्त आरोग्य, जनहित व पर्यावरण सेवा सप्ताहाचे आयोजन करण्यात आले आहे या सप्ताहाच्या दुसऱ्या पर्वामध्ये केज नगरपंचायत अंतर्गत महिलांच्या ३२ आजारावरील रक्ताच्या तपासण्या मोफत करण्यात आले आहेत. महिलांनी स्वतःच्या आरोग्या विषयी जागरूक राहावे असे प्रतिपादन नगराध्यक्षा सौ.सीताताई बनसोड यांनी केले. महिलांनी काही समस्या असल्यास संपर्क करावा असे आवाहन महावितरणच्या कनिष्ठ अभियंता श्रीमती शितल सय्यद यांनी केले आहे. या कार्यक्रमाच्या उद्घाटक म्हणून केज नगरपंचायत च्या नगराध्यक्षा सौ.सीताताई बनसोड तर कार्यक्रमाच्या अध्यक्षा म्हणून कनिष्ठ अभियंता श्रीमती शितल सय्यद यांची प्रमुख उपस्थिती होती, प्रमुख पाहुणे म्हणून गटनेते राजूभाई इनामदार, पत्रकार मुबाशीर खतीब, लखन हजारे, अशोक गायकवाड, उपजिल्हा रुग्णालयाचे श्रीकृष्ण नागरगोजे, सामाजिक कार्यकर्ते सतीश डांगे यांची उपस्थिती होती. सर्वप्रथम उपस्थित मान्यवरांच्या हस्ते महामानवांच्या प्रतिमेचे पूजन करून वंदन करण्यात आले व केज नगरपंचायत च्या वतीने उपस्थित मान्यवरांचे शाल, पुष्पगुच्छ देऊन सन्मान करून कार्यक्रमास सुरुवात करण्यात आली. यावेळी नगराध्यक्षा सौ.सीताताई बनसोड यांनी आरोग्य विषयी महिलांना मोलाचे मार्गदर्शन केले पुढे बोलताना बनसोड म्हणाले की, महिला स्वतःच्या घरकामात, व्यवसायात, नोकरी मध्ये व्यस्त असल्यामुळे त्यांना स्वतःच्या आरोग्याची काळजी घेत नाहीत म्हणून महिलांनी स्वतः च्या आरोग्य विषयी जागरूक राहण्याची गरज आहे असे प्रतिपादन नगराध्यक्षा यांनी केले. यावेळी उपस्थित मान्यवरांनी आपले मनोगत व्यक्त करून महिलांना आरोग्य विषयी मोलाचे मार्गदर्शन करून महिलांनी आरोग्याची काळजी घेणे गरजेचे असल्याचे मत व्यक्त केले. अध्यक्षीय समारोप प्रसंगी श्रीमती शितल सय्यद यांनी, महिला सतत निरंक काम करत असतात स्वतःच्या घरी असो की, समाज सेवेमध्ये असो अथवा शासकीय नोकरीत असो महिला प्रामाणिक काम करत आहेत. समाजातील सर्व व्यक्तींना सुट्टी मिळते परंतु महिलांना



सुट्टी मिळत नसते त्यामुळे महिलांना स्वतः च्या आरोग्याची काळजी घेता येत नाही. जर महिलांना काही समस्या असल्यास महिलांनी माझ्याशी संपर्क करावा असे आवाहन महावितरणच्या कनिष्ठ अभियंता श्रीमती शितल सय्यद यांनी केले. यावेळी फिरोज शेख, अमर हजारे, विवेक बनसोड, श्रीमती भुसारी मॅडम, पवन बनसोड, किरण जोगदंड, राहुल इनकर, आसेफभाई इनामदार, इंजिनीयर सरवदे मॅडम, शिंदे मॅडम,फय्युम शेख, मनोज मस्के, तोफिकभाई सय्यद यांच्यासह केज नगरपंचायत चे नगरसेवक, अधिकारी,कर्मचारी व राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे पदाधिकारी आणि महिलांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती. या कार्यक्रमाचे प्रस्ताविक लखन हजारे यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते महादेव जोगदंड यांनी केले तर उपस्थितांचे आभार अशोक गायकवाड यांनी मानले.

# केज तालुक्यातील ११४ ग्रामपंचायत सरपंच पदाचे आरक्षणाची सोडत कुणाचा हिरेमोड तर कुणी झाले आनंदी !

केज/प्रतिनिधी केज तालुक्यातील सन २०२५ ते २०३० या कालावधीत होणाऱ्या ग्रामपंचायतीच्या निवडणुकीसाठी ११४ सरपंच पदाची सोडत दि. १५ जुलै रोजी उपविभागीय अधिकारी दिपक वजाळे आणि तहसीलदार राकेश गिड्डे यांच्या उपस्थितीत केज काढण्यात आली. केज तालुक्यात सन २०२० ते २०२५ दरम्यान होणाऱ्या ग्रामपंचतीच्या निवडणुकातील सरपंच पदांच्या आरक्षणनाची सोडत दि. २५ फेब्रुवारी रोजी दुपारी ११:०० वा केज तहसिल कार्यालयात उपविभागीय अधिकारी दिपक वजाळे आणि तहसीलदार राकेश गिड्डे यांच्या आदेशा नुसार काढण्यात आली. या वेळी उपविभागीय अधिकारीं दीपक वजाळे, तहसीलदार राकेश गिड्डे यांच्यासह नायब तहसीलदार अशोक भंडारे, आशा गायकवाड-वाघ, रामटेके, नन्नवरे हे उपस्थित होते. अनुसूचित जातीसाठी एससी- १८ ग्राम पंचायती आरक्षित :- अनुसुचित जातींच्या महिलांसाठी मांगवडगाव, इस्थळ, मोटेगाव, साळेगाव, हनुमंत पिंपरी, मस्साजोग, लाखा, बोरीसावरगाव, सादोळा या ९ ग्रामपंचायती आरक्षित आहेत. तर अनुसूचित जातीच्या स्त्रियांसाठी आरक्षित नसलेल्या ग्राम पंचायती सारुळ, कोल्हेवाडी, धनेगाव, सौंदना, उंदरी, वरपगाव/ कापरेवाडी, जवळबन, सोनिजवळा, लव्हुरी या ९ ग्रामपंचायती आहेत. (अनुसूचित जमाती एसटी- २) :- अनुसूचित जमातीच्या महिला करीता ढाकेफळ तर अनुसूचित जमातीच्या नागरिकांच्या महिलांसाठी आरक्षित नसलेल्या धोतरा या ग्रामपंचायती आरक्षित आहेत. ( नागरिकांचा मागास प्रवर्ग ओबीसी- ३१) :- नागरिकांच्या मागास प्रवर्गातील महिलांसाठी जोला, मुलेगाव, पिठीघाट, पिसेगाव, शेलगाव गांजी, सातेफळ, लिंबाचीवाडी, केकाणवाडी, सोनेसांगवी, येवता, रामेश्वरवाडी/ढाकणवाडी, कौडगाव, पाथरा , सावळेश्वर, बोबडेवाडी,




नांदूरघाट तर नागरिकांच्या मागास प्रवर्गातील महिलांसाठी आरक्षित नसलेल्या ग्रामपंचायती आरणगाव, भाटुंबा, भोपला, दरवाडी, डोका, गप्पेवाडी, काशिदवाडी, शिंदी, चिंचोलीमाळी, नाव्होली, लाडेवडगाव, पैठण, दहिफळ (वडमाऊली ), माळेगांव, बावची या प्रमाणे आहेत. (सर्वसाधारण महिला `शिप ३२) :- सर्वसाधारण महिलांसाठी ३२ पदे आरक्षित आहेत. त्यातील खुल्या प्रवर्गातील महिलांसाठी आरक्षित असलेल्या ग्रामपंचायती लाडेगाव, कानडीमाळी, कोठी, बोरगाव (बु.), तरनळी, काळेगाव (घाट), बनसारोळा, भालगाव, विडा/गौरवाडी, कळमअंबा, कासारी, आवसगाव/ वाकडी, पिंपळ गव्हाण, हदगाव, माळेवाडी, दीपेवडगाव, कानडीबदन, कुंबेफळ, सुकळी, वाघेबाभळगाव, बानेगाव, नागझरी, सासुरा, डोणगाव, मुंडेवाडी, पिराचीवाडी, दैठणा, कोरेगाव आणि खुल्या प्रवर्गातील महिलांसाठी आरक्षित नसलेल्या ग्रामपंचायती गोटेगाव, जाधव जवळा, साबला , युसुफवडगाव, होळ, बनकरंजा, एकुरका, तांबवा, आनंदगाव, केवड, सारणी (आं), सुर्डी, शिरूरघाट/ गदळेवाडी, औरंगपुर, चंदनसावरगाव, बेळगाव/केळगाव, जानेगाव, धर्माळा, देवगाव, कोरडेवाडी, अनेगांव, राजेगाव, टाकळी, सांगवी(सा.), आंधळेवाडी, जिवाचीवाडी/तुकुचीवाडी, घाटेवाडी, नारेवाडी, आडस, सारणी(सां.), नायगाव या ग्रामपंचायती आहेत. या सर्व सोडती कु. अर्पिता थोरात या नऊ वर्ष वयाचा बालकाच्या हाताने काढण्यात आल्या. एकूण आरक्षण सोडत एकूण ११४ ग्रामपंचायतीसाठी

| | | |
|---|---|---|
| अ. जा. महिला | --- | ९ |
| अ. जा. अनारक्षित | --- | ९ |
| अ. ज. महिला | --- | १ |
| अ. ज. अनारक्षित | --- | १ |
| ना. मा. प्र. महिला | --- | १६ |
| ना. मा. प्र. अनारक्षित | -- | १५ |
| स. सा. महिला | --- | ३२ |
| सर्व साधारण | --- | ३१ |
| एकूण जागा | ---- | ११४ |

## अंकुरस्वयंसेवी संस्थेच्या वतीने केज येथील जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थ्यांना गणेश व शालेय साहित्याचे वाटप



केज/प्रतिनिधी अंकुरस्वयंसेवी संस्थेच्या वतीने केज येथील जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थ्यांना गणेश व शालेय साहित्याचे वाटप करण्यात आले. अंकुरस्वयंसेवी संस्थेच्या वतीने दिनांक १४ जुलै २०२५ रोजी जि. प. मा. हायस्कुल शिवाजी चौक केज येथील शाळेतील विद्यार्थ्यांना गणवेशाच्या व शालेय साहित्यांचे वाटप करण्यात आले. एकल विधवा , परित्यक्ता (अभया) महिलांच्या इ. १ ते १० वीच्या मुलांना शालेय साहित्याचे वाटप - प्रत्येकी शाळेचे दोन ड्रेस, स्कुलबॅग, कंपासपेटी , पेन , अर्धाडझन वह्या, स्केचपेन , ड्राईंगबुक, पाण्याची बॉटल इ. शै. उपयोगी साहित्याचे वाटप प्रा. हनुमंत भोसले , जि.प.मा. चे मुख्याध्यापक बालासाहेब जोगदंड,अंकुरच्या अध्यक्षा अनिता कांबळे यांच्या उपस्थितीत करण्यात आले . तसेच रेखाताई सरवदे , तसलीम इनामदार यांनी मोलाचे मार्गदर्शन केले. एकपालक महिला आणि मुले उपस्थित होते. मुलांना खूप आनंद झाला. मुलींची संख्या जास्त होती एकूण ३७ विद्यार्थ्यासह माता व पालक यांची उपस्थिती होती. अंकुर चे रत्नमाला गायकवाड , पृथ्वीराज हजारे , आदित्य कापरे , भाग्यश्री पवार , वैजंता गालफाडे यांनी परिश्रम घेतले . शेवटी आभार अंकुरचे सचिव लक्ष्मण हजारे यांनी मानले.

# कर्म करत रहा फळ मिळत राहते-श्रीमती समृद्धी दिवाणे

केज/प्रतिनिधी दिनांक १५ जुलै २०२५ रोजी साने गुरुजी निवासी विद्यालयात गुणवत्ता विकास वाढ संदर्भाने माननीय गटविकास अधिकारी समृद्धी दिवाणे मॅडम यांच्या मार्गदर्शनाखाली केज तालुक्यातील केंद्रप्रमुख व मुख्यमंत्री माजी शाळा सुंदर शाळांचे विस्तार अधिकारी साधन व्यक्ती यांची बैठक संपन्न झाली. केज तालुक्यातील शैक्षणिक गुणवत्ता वाढवण्यासाठी शिक्षकांनी प्रामाणिकपणे आपले कर्म करावे कर्म प्रामाणिक असेल तर फळ मिळते शाळांची गुणवत्ता वाढवण्यासाठी शाळांमधून वेगवेगळे उपक्रम घ्यावेत शिक्षकाने कृतीशील बनावे शाळांचा शैक्षणिक दर्जा व भौतिक दर्जा उंचावणे हे आपल्या सर्वांचे काम आहे उपक्रमशील शाळा झपाट्याने पुढे सरकताना दिसत आहेत त्यामुळे विद्यार्थ्यांना उपक्रमशील बनवा त्याचाच एक भाग सध्या वाचन कुठेतरी थांबलेले आहे वाचन संस्कृती पुन्हा एकदा जोमाने राबली पाहिजे वाचनाची आवड विद्यार्थ्यांमध्ये रुजवण्यासाठी शाळेत अवांतर वाचनाची पुस्तके पुस्तकपेढीच्या माध्यमातून वाचनालयाच्या माध्यमातून शिक्षकांनी उपलब्ध करून द्यावेत



यासाठीत्यांनी स्वतः पुढाकार घेऊन व स्वतः स्पॉन्सर शिप घेऊन सहा शाळांना अनुराग पुस्तकालय आंबेजोगाई चे साहित्य अभिजीत जोंधळे यांच्या माध्यमातून पुस्तक पेटी भेट देण्यात आली एका पेटीत पुस्तकांचे ६० ते ७० नग वयानुरूप उपलब्ध आहेत. इतरही शाळांना पुस्तक उपलब्ध करून देण्यात येतील असे त्यांनी यावेळी बोलताना सांगितले. यावेळी साहित्यिक अभिजीत जोंधळे यांनी पुस्तक पेटी हा उपक्रम गेली दहा वर्षापासून ज्या शाळा वाचन संस्कृती रुसवतील अशा शाळांना देत असल्याचे सांगून या पेटीत पहिलीपासून दहावीपर्यंतच्या विद्यार्थ्यांना वाचन योग्य अशी पुस्तके असल्याचे मत व्यक्त केले. त्याचबरोबर शिक्षकांना वाचनीय अशी तीन ते चार पुस्तके ही या पेटीत आहेत.आपण मुलं वाचत नाहीत अशी तक्रार करतो पण मुलांना जर वाचनाला संधी उपलब्ध करून दिली नाही पुस्तके उपलब्ध करून दिली तर मुले निश्चितच वाचतात हे कर म्हणणारा कृतिशील शिक्षक असावा लागतो प्रतिकूल तेवर मात करणारी पुस्तके मुलांसमोर ठेवली म्हणजे मुले देखील त्यातून प्रेरित होतात प्रत्येक माणसाने आपण मोबाईलवर व्यर्थ किती वेळ घालवतो याचा विचार करावा त्या ऐवजी फक्त दहा मिनिटात दहा पाने पुस्तकातील वाचून होतील असाही निर्वाळीचा संदेश त्यांनी यावेळी बोलताना दिला. मुलं अनुकरणप्रिय असतात मोठी जे करतात तेच मुलं करतात म्हणून अगोदर मोठ्यांनी वाचायला सुरुवात करावी म्हणजे मुले आपोआप वाचतील. यावेळी लक्ष्मण बेडसकर साहेब संस्था अध्यक्ष उद्धवराव कराड सर यांनीही मनोगत व्यक्त केले. सदर बैठकीस ज्येष्ठ शिक्षण विस्तार अधिकारी दत्ता चाटे, श्री. सुनील केंद्रे सर्व केज तालुक्याचे केंद्रप्रमुख सहा शाळांचे मुख्याध्यापक साधन व्यक्ती उपस्थित होते .

बैठकीचे प्रास्ताविक प्रा.कविता गित्ते मॅडम यांनी केले तर सूत्रसंचालन श्री. चोले सर यांनी केले तर आभार केंद्र प्रमुख संजय चवरे सर यांनी मांडले. पुस्तक पेटी दिलेल्या शाळा साने गुरुजी निवासी विद्यालय केज. जिल्हा परिषद प्राथमिक शाळा शिंदी,जिल्हा परिषद माध्यमिक शाळा,भाटुंबा माध्यमिक शाळा, मस्साजोग जिल्हा परिषद प्राथमिक शाळा कळम अंबा जिल्हा परिषद प्राथमिक शाळा कुंबेफळ.

# ०१ लाख ९४ हजार रुपये किमतीचा ०९.७ किलो गांजाच्या झाडासह एक जण ताब्यात. स्थानिक गुन्हे शाखा व पोलीस ठाणे रेणापूरची संयुक्त कारवाई.




लातूर :- ०१ लाख ९४ हजार रुपये किमतीचा ०९.७ किलो गांजाच्या झाडासह एक जण ताब्यात. स्थानिक गुन्हे शाखा व पोलीस ठाणे रेणापूरची संयुक्त कारवाई.*

याबाबत अधिक माहिती अशी की, पोलीस अधीक्षक अमोल तांबे यांचे आदेशान्वये लातूर जिल्ह्यातील अवैध धंद्यावर जोरदार कार्यवाही करण्यात येत आहे. त्याअंतर्गत पोलीस अधीक्षक अमोल तांबे, अपर पोलीस अधीक्षक मंगेश चव्हाण यांचे मार्गदर्शनात दिनांक १५/०७/२०२५ रोजी दुपारी पोलीस ठाणे रेणापूर अंतर्गत निवाडा गावाच्या शिवारात स्थानिक गुन्हे शाखा लातूर व पोलीस ठाणे रेनापुर च्या पोलिसांनी वरिष्ठांच्या मार्गदर्शनात कारवाई करत निवाडा गावाच्या गायरान जागेमधून ०१ लाख ९४ हजार ४०० रुपयांचा ०९.०७ किलो लागवड करण्यात आलेला गांजा जप्त करण्यात आला आहे.

रेनापुर तालुक्यातील निवाडा गावात गायरान खुल्या जागेवर गांजाची लागवड होत असल्याची गुप्त माहिती मिळाली होती. त्याअधारे पोलीस अधीक्षक अमोल तांबे, अपर पोलीस अधीक्षक मंगेश चव्हाण यांचे मार्गदर्शनात स्थानिक गुन्हे शाखा चे पोलीस निरीक्षक सुधाकर बावकर, रेनापुर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक दत्तात्रेय निकम यांच्या नेतृत्वातील पथकाने निवाडा गावातील गांजाचे झाडे लावलेल्या गायरान जमिनीवर टाकून गांजाची ०९.०७ किलो वजनाची झाडे जप्त केली आहे.

या प्रकरणी पोलीस ठाणे रेनापुर येथे गुन्हा दाखल करण्यात आला असून सदर गुन्ह्यात सदर गायरान जमिनीच्या जवळ राहणारा व सदरची जमीन ताब्यात बाळगणारा इसम नामे विजयकुमार राघू गायकवाड, वय ४५ वर्ष राहणार निवाडा, तालुका रेनापुर जिल्हा लातूर. याला अटक करण्यात आली आहे. गुन्ह्याचा पुढील तपास पोलीस करीत आहेत.

सदरची कारवाई वरिष्ठांचे मार्गदर्शनात स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक सुधाकर बावकर, पोलीस ठाणे रेनापुर चे पोलीस निरीक्षक दत्तात्रेय निकम यांच्या नेतृत्वात पथकातील सहाय्यक पोलीस निरीक्षक सदानंद भुजबळ, आदिनाथ पाटील नंदलाल चौधरी पोलीस अंमलदार साहेबराव हाके, रियाज सौदागर, मनोज खोसे, गणेश साठे, सतीश सारोळे, विश्वनाथ गिरी, शिवकुमार कच्छवे, दत्तात्रय गिरी, चंद्रकांत केंद्रे, अरुणकुमार बनसोडे यांनी केली आहे.

# शिक्षकांच्या राज्यस्तरीय निबंध स्पर्धेत सुशील वाघमारे राज्यात प्रथम राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्काराने केले सन्मानित




चाकूर/ प्रतिनिधी :- शंभर शिक्षक क्लब ऑफ जालना तर्फे भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३४ व्या जयंतीनिमित्त शिक्षकांसाठी राज्यस्तरीय निबंध स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या निबंध स्पर्धेचा नुकताच निकाल जाहीर करण्यात आला आहे. राज्यभरातून असंख्य स्पर्धकांनी सहभाग नोंदवला होता. यात राज्यातून प्रथम येण्याचा बहुमान चाकूर तालुक्यातील स्वामी विवेकानंद विद्यामंदिर चापोली चे शिक्षक सुशिल रंगनाथ वाघमारे यांनी मिळविला आहे.

बक्षीस वितरण सोहळा जेईएस महाविद्यालय जालना येथे पार पडला कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माजी प्राचार्य तथा साहित्यिक एम. जी. जोशी होते तर प्रमुख अतिथी म्हणून प्राचार्य डॉ. गणेश अग्निहोत्री , कवयित्री भारती हेरकर, प्राचार्य डॉ अशोकराव खरात, आर आर जोशी, प्रा यशवंत सोनवणे, जगदीश खुडे मुख्य संयोजक राजेभाऊ मगर, डॉ शिवनंदा म्हेत्रे, दीपक चाटे, दत्तात्रेय राऊतवाड, यांच्या हस्ते राज्यस्तरीय निबंध स्पर्धेतील प्रथम क्रमांक प्राप्त शिक्षक सुशिल रंगनाथ वाघमारे यांना राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. यावेळी राज्यभरातील विभागनिहाय, जिल्हानिहाय प्रथम द्वितीय तृतीय अशा १७७ शिक्षकांचा सन्मान करण्यात आला. या स्पर्धेचे १३ परीक्षकांनी परीक्षण केले होते.

राज्यस्तरीय निबंध स्पर्धेतील प्रथम क्रमांक व राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कार प्राप्त केल्याबद्दल सुशिल वाघमारे यांचे सामाजिक राजकीय शैक्षणिक पत्रकारिता क्षेत्रातील मित्रपरिवारकडून अभिनंदन केले जात आहे.

# ०३ लाख १२ हजार रुपयांची प्रतिबंधित सुगंधित तंबाखू जप्त. ०१ व्यक्ती विरुद्ध गुन्हा दाखल. सुधाकर बावकर व त्यांच्या पथकाची कारवाई



लातूर :- ०३ लाख १२ हजार रुपयांची प्रतिबंधित सुगंधित तंबाखू जप्त. ०१ व्यक्ती विरुद्ध गुन्हा दाखल. स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक सुधाकर बावकर व त्यांच्या पथकाची कारवाई.

या बाबत थोडक्यात हकीकत अशी की, पोलीस अधीक्षक अमोल तांबे, अपर पोलीस अधीक्षक मंगेश चव्हाण,यांचे मार्गदर्शनात अवैध धंद्यावर कठोर कारवाई साठी मोहीम जिल्ह्यामध्ये राबविण्यात येत आहे.

त्या अनुषंगाने अवैध धंद्यावर कारवाई करीत असताना दिनांक १५/०७/२०२५ रोजी स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाला महाराष्ट्र शासनाने प्रतिबंधित केलेले अन्नपदार्थ तंबाखूजन्य पदार्थाची अवैध विक्री व्यवसाय करण्यासाठी एक इसम प्रतिबंधित गुटखा,तंबाखू रूममध्ये साठवून ठेवल्याची माहिती मिळाली. सदर माहितीवरून स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक सुधाकर बावकर यांचे मार्गदर्शनात सदरचे पथक दिनांक १५/०७/२०२५ रोजी रात्री ११ वाजण्याच्या सुमारास लातूर शहरातील नाथ नगर,मळवटी रोड भागातील एका घरावर छापा मारून महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र राज्यामध्ये विक्रीसाठी प्रतिबंधित केलेला ०३ लाख १२ हजार रुपयांची सुगंधित तंबाखूचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

प्रतिबंधित सुगंधित तंबाखूची अवैधरित्या साठवणूक व विक्री केलेला इसम नामे ईश्वर रमाकांत गुंडरे, राहणार शाहू चौक, लातूर (फरार) याचे विरुद्ध पोलीस ठाणे विवेकानंद येथे गुन्हा दाखल करण्यात आला असून पोलिसांची चाहूल लागताच नमूद इसम हा पळून गेला असून पोलीस पथक त्याचा शोध घेत आहेत.गुन्ह्याचा पुढील तपास पोलीस करीत आहेत.

सदरची कारवाई पोलीस अधीक्षक अमोल तांबे अपर पोलीस अधीक्षक मंगेश चव्हाण यांचे मार्गदर्शनात, स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक सुधाकर बावकर यांच्या नेतृत्वात पोलीस अंमलदार युवराज गिरी, प्रदीप स्वामी, सिद्धेश्वर मदने, जमीर शेख, राहुल कांबळे यांनी केली आहे.

# मुंबईच्या आजाद मैदानावरील आश्वासनाप्रमाणे ना.गिरीश महाजन व लोकनेते बालाजी पाटील चाकूरकर यांची मुंबईमध्ये झाली बैठक



लातूर- मुंबई येथील आझाद मैदानावर प्रशिक्षण अर्ध्याच्या मागण्यासाठी काढण्यात आलेल्या मोर्चातील आश्वासनाप्रमाणे आझाद मैदानावरील मोर्चाची दखल घेत विधानभवनातील दालनात प्रशिक्षणार्थ्यांच्या शिष्टमंडळाशी कायमस्वरूपी रोजगाराचा आणि वाढीव मानधना संदर्भात सरकार आणि प्रशिक्षणार्थ्यांमध्ये मुख्यमंत्री कार्यालयाच्या सूचनेनुसार मध्यस्थीची भूमिका बजावणारे मा.ना.गिरीश महाजन यांच्यासोबत दि. १५ जुलै २०२५ रोजी लोकनेते बालाजी पाटील चाकूरकर यांची मुंबईमध्ये बैठक संपन्न झाली असून मुख्यमंत्री यांच्याशी मा.महाजन यांनी चर्चा केल्यानंतर मा. ना. गिरीश महाजन यांनी यांनी भेट दिली व मा. मुख्यमंत्री याबाबतीत विचाराधीन येण्या कामी आम्ही त्यांची मानसिकता तयार केली आहे एवढे अधिवेशन संपल्यानंतर आपण एक बैठक करू आणि यातून कसा मार्ग काढता येईल तो काढू. अशी चर्चा झाली असल्याची माहिती बालाजी पाटील चाकूरकर यांनी दिली आहे.

सरकार या मागणीची पुर्तता करण्याकरिता सकारात्मकता निर्माण करत आहो नक्कीच यातून काहीतरी आता मार्ग निघेल. सुप्रीम कोर्टाचे काही आदेश आहेत त्या आदेशाला आधिन राहुन कसा मार्ग काढता येईल ते करू आता तुम्ही निश्चित रहा असे त्यांनी बैठकीदरम्यान आश्वासन दिले असल्याचेही बालाजी पाटील चाकूरकर यांनी सांगितले.

# लातूर जिल्ह्यातील शासकीय वसतिगृहांसाठी ऑनलाईन अर्ज करण्याचे आवाहन

लातूर :- सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागांतर्गत लातूर जिल्ह्यात मुलांची १३ आणि मुलींची १२ अशी एकूण २५ शासकीय वसतिगृहे कार्यरत आहेत. सन २०२५-२६ या शैक्षणिक वर्षासाठी या वसतिगृहांमधील प्रवेश प्रक्रिया ऑनलाइन पद्धतीने राबविली जात आहे. विद्यार्थी https://hmas.mahait.org या संकेतस्थळाचा वापर करून प्रवेश अर्ज भरू शकतात.

शालेय विद्यार्थ्यांसाठी प्रवेश अर्ज भरण्याची अंतिम मुदत १७ जुलै २०२५ आहे, तर अकरावी, बिगर व्यावसायिक पदवी, पदविका प्रथम वर्ष आणि पदव्युत्तर प्रथम वर्षात शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी ही मुदत २३ जुलै २०२५ पर्यंत आहे. इच्छुक विद्यार्थ्यांनी उपरोक्त संकेतस्थळाचा वापर करून किंवा स्थानिक गृहप्रमुख अथवा गृहपाल यांच्याशी संपर्क साधून विहित मुदतीत प्रवेश अर्ज सादर करावेत, असे आवाहन लातूर येथील सहायक आयुक्त (समाज कल्याण) यादव गायकवाड यांनी केले आहे.

# कर्मवीर दादासाहेब गायकवाड सबलीकरण व स्वाभिमान योजनेंतर्गत शेतकऱ्यांना शासनास जमीन विक्रीची संधी

लातूर :- राज्य शासनाच्या सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या १४ ऑगस्ट २०१८ च्या शासन निर्णयानुसार कर्मवीर दादासाहेब गायकवाड सबलीकरण व स्वाभिमान योजनेंतर्गत अनुसूचित जाती आणि नवबौद्ध घटकांतील भूमिहीन तसेच दारिद्र्यरेषेखालील कुटुंबांना ४ एकर जिरायती किंवा २ एकर बागायती जमीन १०० टक्के अनुदानावर वाटप करण्याची योजना कार्यान्वित आहे. या योजनेंतर्गत लातूर जिल्ह्यातील शेतकऱ्यांकडून शासकीय दराने (रेडीरेकनर) जमीन खरेदी करण्यासाठी अर्ज मागविण्यात येत आहेत. इच्छुक शेतकऱ्यांनी आपले अर्ज सहायक आयुक्त, सामाजिक कल्याण, दुसरा मजला, डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, शिवनेरी गेटसमोर, जुनी डालडा फॅक्टरी कंपाऊंड, लातूर येथे सादर करावेत, असे आवाहन करण्यात आले आहे.

जमीन विक्रीस इच्छुक शेतकऱ्यांकडे किमान २ एकर बागायती किंवा ४ एकर जिरायती जमीन स्वत:च्या मालकीची असावी. कमाल मर्यादेची अट नाही. जमीन निर्विवाद आणि बोजारहित असावी. तसेच, ती कोणत्याही न्यायालयीन किंवा महसूल विभागाच्या अपील प्रकरणात नसावी. बागायती जमिनीच्या बाबतीत पाण्याची उपलब्धता आणि जमिनीचा रस्त्याशी संपर्क (रस्त्यालगत किंवा आतमध्ये) याची माहिती अर्जात नमूद करावी. आतमध्ये असल्यास रस्त्याची उपलब्धता स्पष्ट करावी. जमीन शासकीय दराने खरेदी केली जाईल. जिरायती जमिनीसाठी कमाल ५ लाख रुपये आणि बागायती जमिनीसाठी कमाल ८ लाख रुपये प्रति एकर दराने खरेदी होईल. जमीन एकापेक्षा जास्त व्यक्तींच्या मालकीची असल्यास सर्व मालकांची संमती आणि स्वाक्षरी अर्जात आवश्यक आहे.

खरेदीपूर्वी जमिनीची मोजणी केली जाईल आणि त्यानंतरच खरेदीचा अंतिम निर्णय घेतला जाईल. या योजनेंतर्गत लाभार्थ्यांना अर्ज करण्याची आवश्यकता नाही. ज्या गावात जमीन उपलब्ध होईल, त्या गावातील अनुसूचित जाती आणि नवबौद्ध घटकांतील दारिद्र्यरेषेखालील भूमिहीन शेतमजुरांची यादी मागवून, शासन निर्णयातील अटी व शर्तींनुसार लाभार्थ्यांची निवड केली जाईल. अर्ज सादर केल्याने जमीन विक्री बंधनकारक नाही. शेतकऱ्याची संमती असल्याशिवाय जमीन खरेदी केली जाणार नाही. अर्ज केलेल्या प्रत्येक शेतकऱ्याची जमीन खरेदी करणे शासनावर बंधनकारक नाही. इच्छुक शेतकऱ्यांनी वरील अटी व शर्तींसह पूर्ण माहिती भरलेले अर्ज सहायक आयुक्त, सामाजिक कल्याण, लातूर यांच्याकडे सादर करावेत, असे आवाहन करण्यात आले आहे.

# संविधान समर्थक समाज जोडो अभियानअंतर्गत भारतीय बौद्ध महासभा नवी मुंबई जिल्हा शाखेच्या वतीने कार्यकर्ता शिबिर संपन्न

नवी मुंबई / के. एच. हनवते :- दिनांक १३ / ०७ / २०२५ रोजी सकाळी १० ते सायंकाळी ५ वाजेपर्यंत भारतीय बौद्ध महासभा नवी मुंबई जिल्ह्याच्या वतीने नवी मुंबई जिल्हाध्यक्ष : नामदेव जगताप गुरुजी यांच्या अध्यक्षतेखाली सुर्यपुत्र भय्यासाहेब आंबेडकर भवन पंचशील बुद्ध विहार तुर्भे स्टोअर येथे भव्य संविधान समर्थक समाज जोडो अभियान अंतर्गत भव्य जिल्हास्तरीय कार्यकर्ता प्रशिक्षण शिबीर घेण्यात आले . सर्वप्रथम केंद्र व महाराष्ट्राचे वरिष्ठ पदाधिकारी भारतीय बौद्ध महासभेचे राष्ट्रीय सचिव बी. एच. गायकवाड साहेब, ड. डॉ. एस. एस. वानखडे (राष्ट्रीय सचिव तद्वतच केंद्रिय प्रशिक्षण विभागाचे प्रमुख ), त्याचप्रमाणे महाराष्ट्र राज्याचे अध्यक्ष यु. जि. बोराडे गुरुजी, जयवंत लव्हांडे गुरुजी ( महाराष्ट्र राज्य संघटक - कोकन विभाग प्रभारी ), शोभाताई कांबळे ( महिला - जिल्हाध्यक्ष नवी मुंबई ) या मान्यवरांच्या हस्ते आदर्शांची पुजा करून सामुहिक त्रिसरण पंचशील घेण्यात आले. उपस्थित मान्यवरांचे व शाखा अध्यक्षांचे नवी मुंबई जिल्हा कार्यकारिणीच्या वतीने स्वागत करण्यात आले. आजच्या जिल्हास्तरीय कार्यकर्ता प्रशिक्षण शिबीराचे उद्घाटन भारतीय बौद्ध महासभेचे राष्ट्रीय सचिव बी. एच. गायकवाड यांच्या हस्ते मेनबत्ती प्रज्वलीत करून करण्यात आले. शिबीरार्थीचा परिचय, दि बुद्धिस्ट सोसायटी ऑफ इंडियाचे ध्येय उद्देश व मिशन कार्यकर्ता और प्रबोधन की आचारसंहिता या विषयावर, भारतीय बौद्ध महासभेचे राष्ट्रीय सचिव बी. एच. गायकवाड धम्म कार्यामध्ये प्रशिक्षित कार्यकर्तेच आदर्श समाज निर्माण करू शकतात. अशा प्रकारचा संदेश दिला खुपच प्रभावशाली व विनोदात्मक शैलीतुन अनेक उदाहरणे देवुन अप्रतिम मार्गदर्शन करून कार्यकर्ता प्रशिक्षण शिबीरामधील सर्व शिबीरार्थीमध्ये धम्म कार्य जोमाने करण्यासाठी ऊर्जा निर्माण केली. भारतीय बौद्ध महासभेचे राष्ट्रीय सचिव तदवतच केंद्रिय प्रशिक्षण विभाग प्रमुख ड. डॉ. एस. एस. वानखडे यांनी शाखा का व्यवस्थापन कैसा करे या विषयावर प्रवचन सुटसुटीत व मुद्देसुद विषय देवुन उपस्थित सर्वांना भरीव उर्जा दिली, कार्यालयीन कामकाज हा आपल्या समाजाचा आरसा आहे. असा उर्जात्मक संदेश दिला, यु. जि. बोराडे गुरुजी (अध्यक्ष - महाराष्ट्र राज्य ) यांनी पदाधिकारी आणि त्यांची जबाबदारी या विषयावर खुपच प्रभावशाली मार्गदर्शन केले. प्रत्येक पदाधिकाऱ्यांनी आपआपल्या पदानुसार पारदर्शक काम काम करून आदर्शवत कार्यकर्ता तयार झाला पाहिजे. संस्थेचे नांव वाढविले पाहिजे. जोमाने कार्य करण्याचा शिबीरार्थीचा उत्साह वाढविला . धम्मकार्य करण्यासाठी शिबीरार्थींना गती मिळाली. जयवंत लव्हांडे गुरुजी ( महाराष्ट राज्य संघटक तद्वतच कोकन विभाग प्रभारी) यांनीही मार्गदर्शक सुचना दिल्यात ! ड. मिताताई गंगावणे ( सचिव - पर्यटन महाराष्ट्र राज्य महिला कार्यकारिणी) प्रामुख्याने उपस्थित होते. मा. नामदेव जगताप गुरुजी ( जिल्हाध्यक्ष ) यांनी अध्यक्षीय विचार व्यक्त केले. शोभाताई कांबळे ( महिला जिल्हाध्यक्ष व त्यांचे इतर सहकारी महिला आवर्जुन उपस्थित होत्या . आजचे कार्यकर्ता प्रशिक्षण शिबीर यशस्वी होण्यासाठी संजय झनके ( जिल्हा - सरचिटणीस ), प्रकाश माने ( कोषाध्यक्ष ), विजय झनके गुरुजी ( उपाध्यक्ष - संस्कार ), राजेंद्र झेंडे ( सचिव - संस्कार ), आनंदबोधी निकाळजे ( जिल्हा हिशोब तपासणीस), विनोद पाचपिंडे ( उपाध्यक्ष - पर्यटन ), राजेश्रीताई पारधे (सचिव - पर्यटन ), मधुकर हिवराळे (मेजर ) , दिपक कांबळे ( जिल्हा संघटक ), कविता कांबळे जिल्हा मा .संघटक ), सुरेखा सावंत ( जिल्हा संघटक ), पांडुरंग भालेराव ( जिल्हा संघटक ), दत्ता भालेराव ( सचिव पर्यटन ), प्रा. गौतम सोनकांबळे ( संघटक ) नवी मुंबई जिल्हा अंतर्गत संपुर्ण शाखांचे पदाधिकारी, नवनाथ पवार ( अध्यक्ष -जुईनगर शाखा ), जिवन वाडते ( अध्यक्ष - सिवुडस ), सिद्धांत शेजवळ - अध्यक्ष विष्णुनगर शाखा आणि इतर सहकारी महिला शाखांचे पदाधिकारी सुद्धा उपस्थित होते नवनाथ कांबळे - अध्यक्ष चिंचपाडा शाखा आणि इतर सहकारी, पंचशील बुद्ध विहार अध्यक्ष : सतिष खंडाळे आणि इतर सहकाली वैशालीताई आढाव - अध्यक्ष बुद्धप्रतिष्ठाण वाशी शाखा आणि इतर सहकारी, सिद्धार्थ शिरसाळे - जेतवन बुद्ध विहार ऐरोली शाखा अध्यक्ष व इतर सहकारी, केंद्रिय शिक्षक शिक्षिका बौद्धाचार्य , सैनिक जास्तीत जास्त संख्येने उपस्थित होते. आजच्या संविधान समर्थक समाज जोडो अभियानअंतर्गत जिल्हास्तरीय कार्यकर्ता शिबीराच्या कार्यक्रमाचे उत्कृष्ट सुत्रसंचालन मा. संजय झनके गुरुजी ( जिल्हा - सरचिटणीस ) यांनी केले. शोभाताई कांबळे ( महिला - जिल्हाध्यक्ष ) यांनी आपले विचार व्यक्त करून उपस्थित सर्वांचे आभार मानले. सरणत्तय घेवुन आजच्या कार्यकर्ता प्रशिक्षण शिबीराचा समारोप करण्यात आला....



PRINTED BY MAHESH MOTIRAM RATHOD, OWNED, PUBLISHED & EDITED BY ASHOK NAMDEVRAO HANWATE, PRINTED AT MAYUR PRINTERS, PLOT No. B-28, MIDC, NEAR BUS STAND 03, LATUR, Tq. & DIST. LATUR - 413512 (M.S.) PULISHED AT : KHADAK HANUMAN, MILIND NAGAR, LATUR TQ. & DIST. LATUR - 413512 (M.S.) EDITOR : ASHOK NAMDEVRAO HANWATE